जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 JUL 2016

पुढारी

# विद्यापीठातर्फे शैक्षणिक कर्ज जागरुकता कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागांतर्गत असलेल्या युनायटेड वेस्टर्न बँकेचे कै. आर. एन. गोडबोले अध्यासनाच्या वतीने सोमवारी (दि. २५) सकाळी ११ वाजता शैक्षणिक कर्ज जागरुकता कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात केले आहे.

आर्थिक परिस्थितीमुळे कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून भारत सरकारकडून शैक्षणिक कर्ज योजना यापूर्वीच जाहीर करण्यात आली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व इंडियन बँक्स असोसिएशन यांच्या मार्गदर्शनाखाली बहुतेक सर्व बँका विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्ज दरवर्षी देत असतात. माहितीच्या अभावी काही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना या शैक्षणिक कर्ज योजनेची माहिती व्हावी यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे व अग्रणी बँकेचे जिल्हा व्यवस्थापक एम. जी. कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. बँक ऑफ महाराष्ट्रचे एन. व्ही. किणगे, बँक ऑफ इंडियाचे विलास बुजोणे व अध्यासनाचे प्राध्यापक डॉ. श्रीकृष्ण महाजन हे विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज योजनेविषयी मार्गदर्शन करणार आहेत. गरजू विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 JUL 2016

तरुण भारत

# अभियांत्रिकीतील पदव्युत्तर विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्य : डॉ. बागी

प्रतिनिधी
कोल्हापूर

अभियांत्रिकीतील पदव्युत्तर पदवीधारक विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्य आहे, असे मत तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागाने आयोजित केलेल्या 'अभियांत्रिकी पदव्युत्तर शिक्षणानंतरच्या संधी व प्रवेश प्रक्रिया" या विषयावरील मेळाव्यात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.



**मेळाव्यात बोलताना डॉ. जयदीप बागी.**

यावेळी डॉ. बागी यांनी सांगितले की, पदवीनंतर विशेष नैपुण्य संपादन करण्याच्या दृष्टिने पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घेणे इष्ट ठरते. त्यामुळे विशेष कौशल्यांसह प्राविण्य मिळवणे व करिअरच्या विविध संधी मिळतात. तंत्रज्ञान अधिविभागात कॉम्प्युटर सायन्स टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी, एनर्जी टेक्नॉलॉजी, एन्व्हायरमेंटल सायन्स अँन्ड टेक्नॉलॉजी, फुड सायन्स अँन्ड टेक्नॉलॉजी या पाच शाखा उपलब्ध आहेत. या सर्व विद्याशाखांत कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळाची प्रचंड गरज असून स्वतःची आवड, कल, क्षमता व उपलब्ध सुविधा, अनुभवी प्राध्यापक यांचा सारासार विचार करून प्रवेश निश्चित करावा, असे त्यांनी नमुद केले. जागतिक बँकेच्या प्रकल्पातून लाभलेले अर्थसहाय्य यामुळे तंत्रज्ञान अधिविभागात प्रयोगशाळेसाठी भरपूर उपकरणे घेण्यात आली आहेत. त्याचा उपयोग पदव्युत्तर संशोधनासाठी निश्चितच होणार आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे संयोजन व सूत्रसंचालन डॉ. यु. एल. बोंबले यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 JUL 2016

पुण्यनगरी



श्रीपतराव चौगुले महाविद्यालयातर्फे आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. डी. आर. मोरे. सोबत के. एस. चौगुले, डॉ. जे. के. पवार व अन्य मान्यवर.

# कौशल्याधारित विद्यार्थी काळाची गरज

## डॉ. डी. आर. मोरे

**कोतोली / प्रतिनिधी :**
महाविद्यालयात मुला-मुलींची संख्यात्मक वाढ होण्यापेक्षा गुणात्मक वाढ होऊन कौशल्याधारित विद्यार्थी तयार होणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे बीसीयूडीचे संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी केले.

ते श्रीपतराव चौगुले महाविद्यालय माळवाडी-कोतोली (ता. पन्हाळा) येथे संस्थेचे संस्थापक के. एस. चौगुले यांना डी.लिट. पदवी मिळाल्याबद्दल आयोजित केलेल्या ग्रंथतुला सत्कार समारंभप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी ताराराणी विद्यापीठाचे सचिव प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील होते. ग्रामीण भागातील गरीब व होतकरू विद्यार्थी कौशल्याधारित शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून के. एस. चौगुले यांनी महाविद्यालयाचा पाया घालून एक चांगली सोय केली, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी केली.

पश्चिम पन्हाळा परिसरातील ग्रामीण भागातील मुली उच्च शिक्षणापासून वंचित राहू नयेत, तसेच डोंगरी व दुर्गम भागात शैक्षणिक विकास व्हावा यासाठी महाविद्यालयाची स्थापना केल्याचे के. एस. चौगुले यांनी सांगितले.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. जे. के. पवार यांनी केले, तर स्वागत प्रा. डॉ. बी. एन. रावण यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डी. बी. इनामदार यांनी केले. आभार डी. एड.चे प्राचार्य गजानन शिंदे यांनी मानले.

यावेळी मारुतराव परितकर, दिंडे, एस. पी. चौगुले, दगडू पाटील, कोलोलीच्या सरपंच बाळाबाई चौगुले, उपाध्यक्ष प्रा. जी. टी. पाटील, सचिव शिवाजी पाटील, खजानीस एम. एस. चौगुले, प्रा. डॉ. अजय चौगुले, कल्पना चौगुले, वेदिका चौगुले व इतर परिसरातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

---

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 JUL 2016

पुढारी

# चीन समजण्यासाठी भारत समजून घेणे आवश्यक

## शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत डॉ. जबीन जेकब यांचे मत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**
भारत-चीन संबंधांचे भविष्य हे फक्त दिल्ली किंवा बिजिंग केंद्रित नव्हे तर ते राज्य, प्रदेश आणि शहर केंद्रीत असले पाहिजे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राला चीनशी आर्थिक, औद्योगिक तसेच व्यावसायिक संबंध वृद्धिंगत करण्याची मोठी संधी आहे. मुंबई हे आशियाचे एक मोठे बिझनेस केंद्र आहे. त्यामुळे चीनमध्ये मुंबईविषयी मोठे आकर्षण आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व संशोधकांनी चीन समजून घेण्याआधी भारत समजावून घेण्याची आवश्यकता असल्याचे मत इन्स्टिट्यूट ऑफ चायनीज स्टडीज, दिल्लीचे सहायक संचालक डॉ. जबीन जेकब यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागामार्फत आयोजित भारत-चीन संबंध या दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन गुरुवारी झाले. यावेळी डॉ. जेकब बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहात झालेल्या या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. जेकब म्हणाले, चीन समजून घेण्यासाठी भारताला अधिक चांगल्याप्रकारे समजून घेतले पाहिजे. चीनी अभ्यासासाठी इतर वैचारिक सामग्री आवश्यक आहे. या देशाबद्दल कटूता असणे महत्त्वाचे नाही. कारण चीन एकीकडे भारताचा प्रतिस्पर्धी मानला जात असला तरी, त्याच्या क्षमतांचा अभ्यास केला पाहिजे. चीन महाराष्ट्राचा महत्त्वाचा आर्थिक सहकारी होऊ शकतो. महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास चीनी कंपन्याही उत्सूक आहेत. त्याचा लाभ आपण घेतला पाहिजे. चीनने अत्यंत धोरणीपणाने चीनी उत्पादनांचा ब्रँड जगभर विकसित केला आहे. तशाप्रकारे भारतीय उत्पादनांचा ब्रँड जगभरात कसा निर्माण करता येईल, याची शिकवण चीनी अर्थतज्ज्ञांकडून आपण घेण्याची गरज आहे. त्या दृष्टीने चीनी तंत्रज्ञान, चीनी अर्थकारण समजून घेण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चीनला भेट देणाऱ्या शिष्टमंडळामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा समावेश होणे, ही त्यामुळे स्वाभाविक बाब होती, हे लक्षात घ्यायला हवे.

कोल्हापूर आणि चीन याबाबत डॉ. जेकब यांनी सांगितले की, कोल्हापूरच्या कृषी व कृषी आधारित प्रक्रिया उद्योगांमध्येही चीनी तंत्रज्ञानाच्या सहकायनि वृद्धी करण्यासाठी अभ्यास केला पाहिजे. मूळच्या कोल्हापूर जिल्ह्यातीलच कुरुंदवाड येथील गिरी देशिंगकर यांनी भारत व चीन या दोन्ही देशांदरम्यान सहकार्य वृद्धीसाठी १९८०-९० च्या दशकांत मोठे प्रयत्न केले आहेत. त्यामुळे चीनशी संबंधांचा कोल्हापूरचा हा वारसा देशिंगकर यांनी आधीच निर्माण करून ठेवला आहे. तो कोल्हापूरकरांनी पुनरुज्जीवित करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, चीनी भाषा शिकणे भारतीय अर्थकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. चीनसमवेत शैक्षणिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ प्रयत्नशील राहील. यावेळी मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र व नागरिकशास्त्र विभागाचे डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी कार्यशाळेविषयी सांगितले की, इन्स्टिट्यूट ऑफ चायनीज स्टडीज या संस्थेत विद्यार्थ्यांना संशोधनाची मोठी संधी आहे. शेजारी राष्ट्र म्हणून चीनसंदर्भातील अध्ययनाची उत्सुकता विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण करणे आवश्यक आहे.

कार्यशाळेस राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील, डॉ.भगवान माने यांच्यासह शिक्षक, संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. वासंती रासम यांनी प्रास्ताविक केले तर डॉ. रवींद्र भणगे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 JUL 2016

महाराष्ट्र टाईम्स



राज्यशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित कार्यशाळेत बोलताना डॉ. जबीन जेकब. व्यासपीठावर डॉ. वासंती रासम, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, डॉ. सुरेंद्र जोंधळे, डॉ. प्रकाश पवार आदी.

# चीनबरोबर व्यापारी संबंधासाठी महाराष्ट्राला मोठी संधी

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

**डॉ. जबीन जेकब यांचे प्रतिपादन**

भारत-चीन संबंधाचे भवितव्य केवळ दिल्ली किंवा बिजिंगकेंद्रीत नव्हे, तर राज्य, प्रदेश आणि शहरकेंद्री असले पाहिजे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राला चीनशी आर्थिक, औद्योगिक तसेच व्यावसायिक संबंध वृद्धिंगत करण्याची मोठी संधी आहे. मुंबई आशियाचे मोठे बिझनेस केंद्र आहे. त्यामुळे चीनमध्ये मुंबईविषयी मोठे आकर्षण असल्याचे मत न दिल्ली येथील इन्स्टिटयूट ऑफ चायनीज स्टडीजचे सहायक संचालक डॉ. जबीन जेकब यांनी केले. चीन समजण्यासाठी आधी भारत समजून घेणे आवश्यक असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागामार्फत आयोजित 'भारत चीन संबंध' विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. जेकब म्हणाले, 'मुंबई हे आशियामधील सर्वात मोठे बिझनेस केंद्र आहे. त्यामुळे पतंप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चीन भेट देणाऱ्या शिष्टमंडळामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा समावेश होणे ही स्वाभाविक बाब होती. या पार्श्वभूमीवर चीन एकीकडे भारताचा प्रतिस्पर्धी मानला जात असला तरी त्यांच्या क्षमतांच्रा अभ्यास करुन त्यांच्याशी सहकार्य वृद्धिंगत करणे गरजेचे आहे. चिनी कंपन्याही राज्यात गुंतवणूक करण्यास उत्सुक असल्याने महाराष्ट्रातला त्याचा लाभ होऊ शकतो.'

राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील, डॉ. भगवान माने उपस्थित होते. मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र व नागरिकशास्त्र विभागाचे डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट केला. डॉ. वासंती रासम यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रवींद्र भणगे यांनी आभार मानले.

---

23 JUL 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# चीन समजण्यासाठी भारत समजून घ्या

## डॉ. जबीन जेक्रब

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** चीन समजून घेण्यासाठी भारताला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेतले पाहिजे, असे प्रतिपादन इन्स्टिटयूट ऑफ चायनीज स्टडीज, दिल्लीचे सहायक संचालक डॉ. जबीन जेकब यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागामार्फत आयोजित 'भारत-चीन संबंध' या दोनदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. मानव्यशास्त्र इमारतीमध्ये झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. जेकब म्हणाले, चीनच्या अभ्यासासाठी अन्य वैचारिक सामग्री आवश्यक आहे. केवळ कटुता असणे महत्त्वाचे नाही. भारत-चीन संबंधाचे भविष्य हे फक्त किंवा बीजिंग केंद्रित नव्हे, तर ते राज्य, प्रदेश आणि शहर केंद्रित असले पाहिजे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राला चीनशी आर्थिक, औद्योगिक तसेच व्यावसायिक संबंध वृद्धिंगत करण्याची मोठी संधी आहे. मुंबई हे आशियाचे एक मोठे बिझनेस केंद्र आहे. त्यामुळे चीनमध्ये मुंबईविषयी मोठे आकर्षण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चीनला भेट देणाऱ्या शिष्टमंडळामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा समावेश होणे ही त्यामुळे स्वाभाविक बाब होती. या पार्श्वभूमीवर चीन एकीकडे भारताचा प्रतिस्पर्धी मानला जात असला, तरी त्याच्या क्षमतांचा अभ्यास करून त्यांच्याशी सहकार्य वृद्धी करणे गरजेचे आहे.




शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागामार्फत आयोजित राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना इन्स्टिट्यूट ऑफ चायनीज स्टडीज, दिल्लीचे सहायक संचालक डॉ. जबीन जेकब. सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व मान्यवर

चीन महाराष्ट्राचा महत्त्वाचा आर्थिक सहकारी होऊ शकतो. महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास चिनी कंपन्याही उत्सुक आहेत. त्याचा लाभ आपण घेतला पाहिजे.

चीनने अत्यंत धोरणीपणाने चिनी उत्पादनांचा 'ब्रँड चायना' ज्या पद्धतीने जगभरात विकसित केला आहे, तशा प्रकारे भारतीय उत्पादनांचा 'ब्रँड' जगभरात कसा निर्माण करता येईल, याची शिकवण चिनी अर्थतज्ज्ञांकडून आपण घेण्याची गरज आहे. त्या दृष्टीने चिनी तंत्रज्ञान, चिनी अर्थकारण समजून घेण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत, असेही जेकब यांनी सांगितले. ते म्हणाले, कोल्हापूरच्या कृषी व कृषी आधारित प्रक्रिया उद्योगांमध्येही चिनी तंत्रज्ञानाच्या सहकार्याने वृद्धी करण्यासाठी त्याचा अभ्यास केला पाहिजे. मूळच्या कोल्हापूर जिल्ह्यातीलच कुरुंदवाड येथील गिरी देशिंगकर यांनी चीनविषयक अभ्यासक म्हणून भारत व चीन या दोन्ही देशादरम्यान सहकार्य वृद्धीसाठी १९८०-९०च्या दशकांत मोठे प्रयत्न केले आहेत. त्यामुळे चीनशी संबंधांचा कोल्हापूरचा हा वारसा देशिंगकर यांनी आधीच निर्माण करून ठेवला आहे. तो कोल्हापूरकरांनी पुनरुज्जीवित करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, चिनी भाषा शिकणे भारतीय अर्थकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. चीनसमवेत शैक्षणिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी शिवाजी विदयापीठ प्रयत्नशील राहील. यावेळी मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र व नागरिकशास्त्र विभागाचे डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट केला. ते म्हणाले, 'इन्स्टिट्यूट ऑफ चायनीज स्टडीज' या संस्थेत विद्यार्थ्यांना संशोधनाची मोठी संधी आहे. शेजारी राष्ट्र म्हणून चीनसंदर्भातील अध्ययनाची उत्सुकता विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण करणे आवश्यक आहे.

डॉ. वासंती रासम यांनी प्रास्ताविक केले तर, डॉ. रवींद्र भणगे यांनी आभार मानले. राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ.प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील, डॉ.भगवान माने यांच्यासह शिक्षक, संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते.

23 JUL 2016

महा

# विद्यार्थ्यांच्या जिद्दीला हवे समाजाचे बळ

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

परिस्थितीने कूस बदलली नाही म्हणून दुःख करत बसण्यापेक्षा शिक्षणानेच ही परिस्थिती बदलून टाकण्याचे स्वप्न पाहणाऱ्या दहा विद्यार्थ्यांच्या जिद्दीला 'महाराष्ट्र टाइम्स'ने हेल्पलाइन उपक्रमातून साथ दिली आहे. गरिबीशी संघर्ष करीत समाजाकडून मिळणाऱ्या मदतीच्या जोरावरच गुणवंत विद्यार्थ्यांची स्वप्ने साकारली जाणार आहेत. त्यांच्या शिकण्याच्या जिद्दीला आर्थिक आधाराचे पंख मिळाले तर यशाच्या आकाशातील त्यांची भरारी निश्चित आहे. त्यासाठी 'महाराष्ट्र टाइम्स'तर्फे हेल्पलाइन उपक्रमातून साद घातली आहे.

कुणाचे न कळत्या वयात पितृछत्र हरपले आहे तर कुणाची आई काळाच्या पडद्याआड गेली आहे. आईवडील असूनही परिस्थितीमुळे काहीजण गरिबीचे चटके सोसत आहेत. हातावरचं पोट असलेल्या मायबापाला मदत करत काहीजण शिक्षणाचे व्रत जपत आहेत. त्यांना या उपक्रमातून दातृत्वाच्या माध्यमाने संकलित होणारी आर्थिक रक्कम या दहा मुलांचे आयुष्य बदलून टाकणारी आहे. या मुलांच्या अंगी असलेल्या हुशारीतून काहीतरी करण्याची असीम उमेद आहे. परिस्थितीने उभारलेल्या अडथळ्यांच्या डोंगरांना भेदण्याची जिद्द आहे... नियतीने फेकलेले फासे उलटून लावण्याचा निर्धार आहे... नाही ते फक्त आर्थिक पाठबळ.

या मुलांकडे जिद्द आहे, पंख आहेत, त्या पंखांना बळ देण्यासाठी केलेल्या आवाहनाला गेल्या तीन वर्षात दानशूर व्यक्तींनी चांगला प्रतिसाद दिला. गुणवंत विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण केवळ आर्थिक समस्यांमुळे अडू नये, या उद्देशाने यंदाही 'मटा हेल्पलाइन'द्वारे १० विद्यार्थ्यांच्या पंखांना बळ दिले जात आहे. गरिबीचे चित्र बदलण्यासाठी शिक्षणाची कास धरणाऱ्या या मुलांच्या स्वप्नाला सत्यात आणण्यासाठी आता वाचकांमधील दातृत्वाने आपला हात देण्याची गरज आहे. आपल्या एका छोट्याशा मदतीने या मुलांचे ध्येय साध्य होईल.

>> बळ हवे पंखांना...६



## गुणवंतांचे व्हा आधार

डॉ. एपीजे कलाम यांनी देशाला महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहिले होते. ते सत्यात उतरवण्यासाठी कृतिशील व सृजनशील युवकांची आवश्यकता आहे. सक्षम युवक घडण्यात कोणतीही बाधा येऊ नये, यासाठी महाराष्ट्र टाइम्सने मदतीचा हात दिला आहे. केवळ आर्थिक परिस्थितीमुळे युवकांची पीछेहाट झाल्यास एक वैज्ञानिक, अभ्यासू तत्त्ववेत्त्यापासून देश वंचित राहू शकतो. डॉ. कलाम यांचे स्वप्न आणि युवकांच्या करिअरला नवी दिशा देण्यासाठी दानशूर व्यक्ती आणि संस्थांनी आर्थिक मदत करुन त्यांच्या पंखांना बळ द्यावे. आर्थिक परिस्थितीवर मात करुन दहावी परीक्षेत यश मिळवलेल्या यशस्वी शिलेदारांचे अभिनंदन.

- डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू